REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 11 | AUGUST - 2018

# चारचौघी... चाहूल..या नाटकांच्या निमित्ताने.

गौरी कानिटकर
संशोधक टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,पुणे.

**प्रस्तावना :**



१९७० पूर्वीच्या स्त्री जीवनाला, सत्तर नंतर एक वेगळे वळण लागले.स्त्रीमुक्ती वर्षानिमित्ताने झालेल्या आंदोलनाची पार्श्व भूमी सत्तर नंतरच्या स्त्री जीवनाला आहे. जुन्या काळातल्या स्त्रीची कुचंबणावेगळी होती , आणि नव्या बदललेल्या वातावरणात ती वेगळी आहे. ' हम दो हमारे दो ' पासून ' एकच मूल पुरे 'पर्यंत कुटुंब संस्थेचा प्रवास झाला. १९८० च्या दशकात एक नवा मध्यमवर्ग आणि त्याच्या बरोबर वाढता चंगळवाद यांचा उदय झाला . रेडीओ, टि व्ही ही प्रतिष्ठेची बिरुदे बनली . भौतिकवादी संस्कृतीमुळे संवेदनाही भौतिकवादी च बनल्या. पती आणि पत्नी दोघेही अर्थार्जन करू लागल्यामुळे घरात वस्तूंची रेलचेल झाली.१९८५ नंतरच्या काळात एकत्रकुटुंब पद्धती संपुष्टात आली. किंबहुनापूर्वीचीएकत्र कुटुंबाची व्याख्याही बदलली.चौकोनी कुटुंब दुभंगू लागले. प्रत्येकाच्या वाट्याला एकाकीपण आले. याचे चित्र वाडा चिरेबंदी, आत्मकथा या नाटकातून आले. अर्थार्जनासाठी बाहेर पडलेल्या स्त्रीची दुःखे आता परिचित झाली होती.याकाळातलीस्त्रीचे आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र असणे ही नवलाईची बाब राहिली नव्हती. किंवा त्यांचे उच्चशिक्षित असणे हेही नवीन नव्हते. त्या बुद्धिमान, प्रज्ञावान होत्या. प्रस्थापित मूल्य व्यवस्थेला प्रश्न विचारणाऱ्या होत्या. नशिबाला दोष देत रडणाऱ्या नव्हत्या. आल्या प्रसंगाला खंबीरपणे तोंड देणाऱ्या होत्या. जोडीदाराचे वागणे पटले नाही, तर त्याच्यापासून विभक्त होऊन समर्थपणे स्वतःचे आयुष्य मार्गी लावणाऱ्या होत्या. गेल्या शंभर दीडशे वर्षातल्या सुधारणावादीचळवळींचे ते संचित होते.या सगळया सामाजिक बदलाचे भान नाटककारांना होते. त्यातूनच प्रशांत दळवींसारख्या नाटककाराच्या लेखणीतून ' चारचौघी ' उतरले.

चार स्त्रियांच्या चार समस्या या नाटकाच्या रूपाने नाटककाराने मांडल्या आहेत. म्हटले तर हे नाटक चार जणींचे आहे आणि म्हटले तर स्वतःच्या अस्तित्वाचा अर्थ , स्वतःच्या अस्मितेच्या अर्थ शोधणाऱ्या प्रत्येक स्त्रीचे आहे. या नाटकातील आई ही एका विवाहित पुरुषाच्या - आबांच्या प्रेमात पडलेली आणि त्याच्यापासून झालेल्या तीन मुलींना जन्म देणारी आहे.विद्या,वैजू आणिविनी अशा ह्या तीन मुली आहेत. आईस्वतःचे स्वतंत्र बिऱ्हाडथाटते.तीशिक्षिकेची नोकरी करणारी असते. आबांची या घराला आर्थिक मदत आहे. पणही आई मनाने खंबीर आहे, स्वतःचे निर्णय स्वतः घेणारी आहे. लग्नाविनाराहून तीन मुलींना जन्म देणारी म्हणून समाजाची हेटाळणी तिला सहन करावी लागते. मुलींनाही तिने स्वतंत्र पद्धतीने वाढविले आहे. त्याच्या परिणामांना सामोरे जायलाही शिकवले आहे.

ह्या तिन्ही मुलींची , प्रत्येकीची कहाणी वेगवेगळी आहे.

विद्याही प्रोफेसरअसते . डॉक्टरेट मिळवलेली करिअर करणारी असते. तिने पत्रकार आशिष शी लग्न केलेले असते. तिला मिनू नावाची मुलगी असते. संसार बऱ्यापैकी चलू असताना गीता पानट नावाच्या पत्रकार मुलीशी त्याचे प्रेमाचे संबंध येतात, आणि तसे तो विद्याला स्पष्ट सांगतो. त्यांचे त्यावरून भांडण होते. त्यावेळी आशिष तिचा जन्मच अनैतिक संबंधांमधून झाल्याचा उल्लेख करतो. तो घाव तिला वर्मी बसतो आणि ती मि नूलाआशिषकडे ठेऊन आईच्या घरी निघून येते. तिला वाटते कि फक्त आपले च असे वडील असायला हवे होते. दोन घरांमध्ये वाटलेले नको होते. आई या उद्गारांनी व्यथित होते. तिने त्यांना वाढवताना काढलेल्या खस्तांची तीजाणीव करून देते. पुढे विद्याला घटस्फोट मिळतो. विद्या च्या पाठची बहिण असते वैजू. ती समोरच राहणाऱ्या श्रीकांत शी लग्न करते. श्रीकांत हा एकेकाळच्या वतनदार कुटुंबियांचा वारस असतो. त्यामुळे त्याला कुणाच्या हाताखाली काम करणे कमीपणाचे वाटते. वैजू एका कंपनीत स्टेनोग्राफर ची नोकरी करत असते. तिच्यावरच

सगळी आर्थिक जबाबदारी पडते.तिला दिवस गेलेले असतात. तिला नुसते बसून खाणाऱ्या नवऱ्याची चीड येत असते. कर्तृत्व शून्य नवरा आणि त्याच्या संबंधातून होणारे मूलही तिची व्यथा आहे.

सगळ्यात लहान विनी , ही आधुनिक आहे. प्रकाश आणि विरेन हे दोन पुरुष तिच्या आयुष्यात येतात. तिला दोघेही वेगवेगळ्या कारणांसाठी आवडत असतात. प्रकाशची हुशारी आणि वीरेनची धडाडी तिला मोहून टाकीत असते. कुणा एकाचीच तिला निवड करता येत नाही त्यामुळे दोघांशी लग्न करायचा क्रांतिकारी विचार ती बोलून दाखवते. इथे गिरीश कार्नाड ह्यांच्या हयवदन नाटकाची आठवण येते. हा प्रस्ताव प्रकाशाला मान्य होत नाही. त्यामुळे विनी लग्न न करता एक टं राहण्याचा निर्णय घेते.

अशीकथावस्तू असलेले हे नाटक १९९१ साली आलेले आहे. आधुनिक संवेदना असलेल्या स्त्रियांचे अवकाश लेखक प्रशांत दळवी यांनी फार परिणामकारक पद्धतीने उभे केले आहे.लग्न एव्हढं महत्वाचे का असते ? " काय होते आपले लग्न होते म्हणजे? आपल्याला बहुतेक वेगवेगळ्या दुःखांच्या राज्याची राणी बनवलं जातं . प्रत्येकीची वेदना वेगळी, हुंदका वेगळा. " असे विद्याला वाटत राहते. आई आणि आपल्या दोघी मोठ्या बहिणी यांचे लग्नाने काय चांगले झाले असा प्रश्न विनीला पडतो. लग्नाच्या बाबतीतली ही गोंधळलेली मनस्थिती , हाप्रश्न फक्त विनी चाच नाही,एकूणच नवीन पिढीतल्या लग्नाला उभे राहिलेल्या मुलींचे ती प्रतिनिधित्व करते आहे.

## तत्कालीन सामाजिक परिस्थिती

१९९० च्या दशका नंतरएकूणच सामाजिक परिस्थितीमध्ये झपाट्याने फरक पडत गेला. १९९१ मध्ये भारतीय सरकारने खुल्या अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला . त्यामुळे दबलेल्या अर्थव्यवस्थेला संजीवनी मिळाली आणि काही वर्षांमधेच भारताची आर्थिक स्थिती सुधारून सक्षम अर्थव्यवस्थेकडे भारताची वाटचाल सुरु झाली. पर्यायाने भौतिक गोष्टींना अवाजवी महत्व येऊ लागले. चंगळवादाची सुरुवात झाली. याचा परिणाम कुटुंब व्यवस्था, विवाहसंस्था यावरही पडत गेला.विवाहसंस्था ही अत्यंत महत्वाची सामाजिक संस्था आहे. भौतिक सुखां च्यामागे लागताना माणसामाणसा मध ल्या नात्याचा, नैतिक मूल्यांचा विचार मागे पडू लागला. माणसांपेक्षा वस्तू महत्वाच्या वाटू लागल्या. जागतिकीकरणाने सोयीचे तेव्हढेच जग जवळ येऊ लाग ले होते. भौतिक सुखांच्या मागे लागताना आपण आपले स्वत्व विसरतोयका याची जाणीव एकविसाव्या शतकाच्या शेवटच्या पाच सहा वर्षात प्रकर्षाने होऊ लागली होती.

याचे प्रतिबिंब प्रशांत दळवींच्या ' चाहूल ' मध्ये तंतोतंत उतरले. प्रगतीसाठी तडजोड हा परवलीचा शब्द असलेले हे नाटक आहे.

मकरंद आणि माधवी यांचे हे नाटक आहे. त्यांच्या लग्नाला पाच वर्षे झा लेली असतात.ते नुकतेच एका नवीन घरात शिफ्ट झालेले असतात . एका संध्याकाळी मकरंद ऑफिस मधून घरी परतलेला असतो. त्याची मनःस्थिती अस्वस्थ असते. तो त्याचा राग टूथपेस्ट पासून वर्तमानपत्रात ल्यामजकुरापर्यंत सर्व गोष्टींवर व्यक्त करत असतो.आणि माधवी मात्र नवीन घर सजवण्याच्या कल्पनेत रमलेली असते . त्याचे कुठे बिनसलंय हे तिला कळत नसते. ती त्याला तसे विचारतेही. मकरंद च्या बॉस ने मंडलिक ने माधवीला एका रात्रीसाठी लोणावळयाला बोलावले आहे असे तो तिला टप्प्याटप्प्याने सांगतो.त्यानंतर जे काही घडतं ती या नव्या युगाची चाहूल आहे , असे म्हणल्यास वावगे ठरणार नाही. मंडलिक ने केलेल्या मागणीच्या निमित्ताने या दोघांच्यात होणारी बौद्धिक, मानसिक, भावनिक उलथापालथ हाच या नाटकाचा विषय आहे. घरातले सगळे वैभव या मंडलिक च्या कृपेनेच आलेले आहे. आणि मुख्य म्हणजे याची सवय या दोघांनाही झालीअसते.

आधी जी मूल्ये सोबत घेऊन मकरंद माधवी जगलेले असतात त्यांना सोयीस्करपणे काळाशी विसंगत ठरवत आणि स्वतःच्या भौतिक सुखांना श्रेष्ठ ठरवत मकरंद आणि माधवी मंडलिकसमोर मिंधे होत त्याचा प्रस्ताव स्वीकारतात.थोडक्यात हे स्वतःच्या वागण्याचेसमर्थनच असते.

अधिक सुखाच्या मृगजळामागे धावणाऱ्या मकरंद माधवीचे हे कृत्य म्हणजे अध:पतनाची सुरुवात आहे .अधिक हवे, अजून हवे ही हाव न संपणारी आहे.मध्यमवर्गीयांच्या संभाव्य अधःपतनाचा इशारा यातून नाटककार देत आहे.मध्यमवर्गाची जीवनशैली , प्रसारमाध्यमांचे त्यांच्यावर होणारे आक्रमण , महत्वाकांक्षा, त्यापायी स्वीकारले जाणारे मार्ग इत्यादी वर हे नाटक भाष्य करते. या नाटकात स्त्री कडूनही मध्यमवर्गीय नीति मूल्यांची पायमल्ली कशी होते आणि त्यामागची करणे स्वतःलाच कशी पटवून दिली जातात, व जीवनाच्या वेगवान प्रवाहात स्त्रीही कशी सामील होते याचे हे प्रत्ययकारी चित्रण आहे.परीक्षा पाहणारा असा एखादा प्रसंग अचानक अंगावर कोसळतो तेव्हा वैचारिक बैठक पक्की नसेल तर चांगले काय आणि वाईट काय ते ठरवायला आपण कसे असमर्थ असतो ते ह्या नाटकातून समजते. मंडलिक सारखी माणसेजागोजागी भ्रष्ट

करायला टपलेली आहेतच आणि आपल्या मूल्यांपासून बाजूला जायला लावणारे क्षण ही अनेकदा प्रत्येकाच्या आयुष्यात येत असतात. त्यावेळीयोग्य, आपल्या हिताचा प्रतिसाद देण्याचा पर्याय नेहमीच खुला असतो.नाटककाराने प्रेक्षक शरण शेवट केला नाही हे विशेष. माधवी चे न थांबणे हीच त्या दोघांच्या विचारधारेची अटळ परिणती होती.

'चाहूल' या नाटकाने वीस वर्षापूर्वी चंगळवादाची चाहूल घेण्याची संधी नाटककाराला दिली आणि तीच आजची जीवनशैली ठरते आहे.

आताच्या काळाचे हे भीषण वास्तव आहे. माणसामाणसा मधली ना तीदिवसेंदिवस कमी महत्वाची वाटत आहेत. कुणासाठी तरी काहीतरी आवर्जून करायचे ही गोष्ट सोयीस्कर रित्या विसरली जाते. संयमहे मूल्य तितकेसे महत्वाचे वाटत नाही हि खेदाची गोष्ट आहे.